नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 25/09/2021 (शनिवार)

(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. अरोली :- अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील मौजा कोंदामेंढी येथे दिनांक 24/09/2021 चे 08.00 वा. सुमारास फिर्यादी नामे- सौ रूपाली नितेश जांबुळकर, वय 25 वर्ष, रा. कोदामेंढी ता. मौदा यांना जुने घर पाडून नविन घर बांधायचे असल्याने त्यांनी जुने घर पाडले असता जागेचे कारणावरून आरोपी नामे- कु सिमा चैतराम हेडावू, वय 24 वर्ष, रा. कोंदामेंढी ता. मौदा हिने फिर्यादी यांना डावे हाताचे बोटाला व उजव्या हाताचे मनगट जवळ दाताने चावा घेवून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीची सवत सुनिता जांबुळकर व तुळसाबाई जांबुळकर यांना शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 325, 323, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रशांत काळे मो क्र. 9822549695 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :- अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील मौजा वडंबा एनएच-44 रोड येथे दिनांक 23/09/2021 चे 19:45 वा. ते 20.00 वा. दरम्यान मृतक अनोळखी महिला वय अंदाजे 35 ते 40 वर्ष वयोगटातील हि जबलपुर ते नागपुर कडे जाणाऱ्या रोडनी वेडसर व पागल अवस्थेत पायदळ जात असतांना मागुन येणाऱ्या अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन तिला धडक दिली. या अपघातात अनोळखी महिला हि जागीच मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी लक्ष्मी घोडके या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर